# मोहल्ला समिती

डॉ.दलबीत भारती, पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांनी अकोला शहर व अकोला जिल्हयातील जातीयदृष्टीने संवेदनशिल पो.स्टे. हददीत जातीय सलोखा निर्माण करणे आणि जातीय दंगल होवू नये म्हणुन प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी दिनांक १७.०१.२००९ रोजी अकोला येथे पोलीस अधीक्षक कार्यालयात अधिका-यांची बैठक घेतली त्याचा इतीवृतांत खालील प्रमाणे.

वरील बैठकीत प्रभारी पोलीस अधीक्षक श्री. प्रविणकुमार पडवळ, उप विभागीय पोलीस अधिकारी अकोट श्री. हिरासिंग जाधव, परिविक्षाधीन पोलीस उप अधीक्षक श्रीमती कल्पना द. बारावकर आणि पो.नि.जिविशा श्री. के.बी.सुरोशे, पो.नि. स्थागुशा श्री.यु.के.जाधव, श्री.के.बी. शिरसाट ठाणेदार पोस्टे जुनेशहर, श्री. यु.टी.जाधव ठाणेदार पोस्टे सिव्हील लाईन, अकोला, श्री. व्हि. बी.सोनोने ठाणेदार पोस्टे बार्शिटाकळी, श्री. ओ.पी.अंबाडकर पोस्टे मुर्तिजापुर, श्री. डि.अे.वंतरम ठाणेदार पोस्टे पिंजर, श्री. अे.टी.इंगळे ठाणेदार पोस्टे अकोट, श्री. मोहोडे पो.नि. बि.स.वि., श्री. त्रिपाठी ठाणेदार पोस्टे सिटी कोतवाली अकोला, श्री. जि.एल. पडघन ठाणेदार पोस्टे अकोट फाईल अकोला हजर होते.

सर्व प्रथम पोलीस महानिरीक्षकांनी अकोला जिल्हयात आणि मुख्यत्वे अकोला शहरात जातीयदृष्टीने परिस्थिती फार नाजुक दिसुन येते असे सांगीतले. हिंदु व मुस्लीम समाजाचे लोक लहान-सहान घटनेला जातीय रंग देवुन दोन्ही समाजात तेढ निर्माण होईल आणि कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होईल असे कृत्य करतात. ज्या ठिकाणी हिंदु व मुस्लीम समाजाचे लोक राहतात त्या ठिकाणी इतर भागासारखे गुन्हे जसे अपघात होणे, छेडाछेडीचे प्रयत्न होणे, ठोस लागणे इत्यादी घडणे साहजिक बाब आहे. परंतु अशा प्रत्येक घटनेला जातीय रंग देवुन दोन्ही बाजुला मोठया संख्येने लोक एकत्रित येवून गोंधळ करणे, दगडफेक करणे इत्यादी हेच दर्शविते की, समाजात हिंदु व मुस्लीम मध्ये तेढ आणि कटुता आहे ही बाब चिंताजनक असुन लवकरात लवकर जातीय सलोखा निर्माण करणे आणि जातीयदंगल होणार नाही म्हणुन प्रभावकारी उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे आहे.

उपस्थित सर्व पोलीस ठाणे अंमलदारांचे आणि उपविभागीय पोलीस अधिका-यांचे म्हणणे ऐकुन एकंदरीत परिस्थितीवर सविस्तर चर्चा करुन खालील प्रमाणे उपाय योजना करण्याचे ठरविण्यात आले.

**(१) मोहल्ला समितीचे गठण करणे**

(अ) अकोला शहरातील सर्व पोलीस स्टेशनला आणि जिल्हयातील जातीयदृष्टीने संवेदनशिल पोलीस स्टेशनवर नमुद केलेले ईतर पोलीस स्टेशनच्या हद्दीत जातीयदृष्टीने संवेदनशिल भागांना वेगवेगळे भागात विभागुन प्रत्येक भागाकरीता मोहल्ला समित्या स्थापित करण्यात यावेत. सदर समितीत सर्व धर्म, समाज, वर्ग तसेच वर्गाचे पुरुष व महीलांचा समावेश असावा व्यापारी संघटना, कामगार संघटना, रिक्षा युनीयन, महीला मंडळ इत्यादी संस्थेचे प्रतिनिधी समाविष्ठ करावेत. मोहल्ला समितीत सामिल केले जाणारे लोक गुन्हेगार प्रवृतीचे आणि गुन्हेगारी इतिहास असलेले नसावेत. धार्मिक सामाजिक किंवा ईतर संघटनेच्या प्रतिनिधींचा समावेश करावयाचे आहे. अशी संस्था व त्याचे प्रतिनिधी कट्टरपंथी नाहीत याची खात्री करावी.

(ब)मोहल्ला समितीचे सदस्यांचे नाव,पत्ता, फोन क्रमांक इत्यादीची माहीतीसह एका रजीस्टरमध्ये नोंदी कराव्यात. महीन्यातुन कमीत-कमी एकदा मोहल्ला समितीची बैठक संबंधीत चौकी इन्चार्ज यांनी घ्यावी. पोलीस स्टेशन, ठाणेदार जर कायदा व सुव्यवस्था कामात व्यस्त नसतील तर त्यांनी आवर्जुन बैठकीस हजर राहुन मार्गदर्शन करावेत.

(क) मोहल्ला समितीच्या बैठकीच्या लोकांना उपयोग होईल म्हणुन महानगरपालिका, मराविवि कंपनीचे प्रतिनिधी, वाहतुक पोलीस प्रतिनिधींना सुध्दा बैठकीस आमंत्रित करावे. असे प्रतिनिधींना सदर बैठकीस पाठविण्याबाबत तालुका स्तरावर संबंधीत उप विभागीय पोलीस अधिकारी यांनी अकोला शहराकरीता पोलीस अधीक्षक यांनी संबंधीत महानगरपालिका व इतर विभागांना विनंती करावी.

(ड) मोहल्ला समितीच्या बैठकीत सर्व प्रथम पोलीस अधिका-यांनी कायदा व सुव्यवस्था आणि जातीयसलोखा निर्माण करण्यासाठी तसेच आतंकी हमला / घटना टाळण्यासाठी कसे सतर्क राहावे आणि पोलीसांना कसे सहकार्य करावे याबाबत सदस्यांना मार्गदर्शन करावे. त्यानंतर त्यांनी उपस्थित महानगरपालिका, मराविवि कंपनी, वाहतुक पोलीस यांचे प्रतिनिधीला उपयोगी आणि आपली दैनदिनी सार्वजनिक अडी-अडचणी सदस्य यांना मांडण्याची संधी दयावी. मोहल्ला समितीच्या बैठकीमध्ये कोणत्याही प्रकाराचे वैयक्तीक किंवा कोणते ही विशिष्ट समाज, धर्म, वर्ग, संस्था यांचेवर आरोप प्रत्यारोप होणार नाहीत याची विशेष दक्षता घ्यावी. एकंदरीत मोहल्ला समितीच्या बैठकीच्या दरम्यान वातावरण सलोख्याचे व सौहार्दपुर्वक राहील याची पोलीस अधिका-यांनी काळजी घ्यावी

(इ) मोहल्ला समितीची बैठक त्या भागातच असलेले शक्यतो सार्वजनिक ठिकाण, शाळा मनपा, सभागृहे किंवा इतर वादग्रस्त नसलेले हॉल, मंगल कार्यालये इत्यादी ठिकाणी घ्यावी. सोयीस्कर असल्यास पोलीस स्टेशनचे / चौकीचे आवारात सुध्दा उघडयावर शामीयाना टाकुन घेण्यास हरकत नाही. सभेकरीता खुर्च्या पोलीस मुख्यालय / संबंधीत पोलीस स्टेशनने पुरवावी आणि सभेची व्यवस्था करण्यास पुर्ण सहकार्य करावे.

(फ) सभेकरीता वेळीच निमंत्रण पत्र पाठवावे आणि फोनव्दारे आवश्यकतेनुसार पाठपुरावा करावा. सभेकरीता उपस्थित असलेले लोक आणि चर्चा करण्यात आलेले महत्वाचे मुद्दे नमुद करफन इतिवृतांत तयार करावे व त्याची एक प्रत उप विभागीय पोलीस अधिकारी पोलीस अधीक्षक यांना सादर करावी. अशा प्रत्येक बैठकीबाबत उप विभागीय पोलीस अधिकारी व पोलीस अधीक्षक यांना पण निमत्रित कराव जेणे करुन त्यांना सोयीस्कर असल्यास ते हजर राहुन सदस्यांना मार्गदर्शन करु शकतील खरे म्हणजे उप विभागीय पोलीस अधिकारी, अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक यांना संवेदनशिल भागात होणा-या मोहल्ला समितीच्या बैठकीत वेळोवेळी उपस्थित राहण्याचे प्रयत्न करावेत.

(ग) बैठक शक्यतो सायंकाळच्या वेळेत जेव्हा लोक आपल्या कामावरुन घरी येतात व जो पर्यंत जेवणाची वेळ होत नाही त्या दरम्यान ठेवाव्यात किंवा सुट्टीच्या दिवशी सोईस्करवेळी बैठकीचे आयोजन करावे. जेणे करफन सदर मोहल्ला समिती बैठकीला जास्तीत जास्त लोकांची उपस्थिती राहील जे सदस्य तीन बैटकीत उपस्थित राहत नाहीत त्यांना संपर्क साधुन गैरहजेरीची कारणे समजुन घ्यावीत आणि आवश्यक वाटल्यास त्यांचे ऐवजी दुसरे सदस्य घेण्यात यावेत.

(घ) मोहल्ला समिती जातीय सलोखा निर्माण करण्यास चागले सहकार्य करु शकते. मुंबई शहरात वाटल्यास मुंबई शहरातील कोणत्याही ठाण्याशी संपर्क साधुन मोहल्ला समितीची कार्यपध्दती व उपयोगीता बाबत जास्त माहीती घ्यावी.

## २) पोलीस गस्त वाढविणे आणि लोकांशी संपर्क साधणे

संबधीत पोलीस स्टेशन अंमलदारांनी संवेदनशिल भागात पोलीस गस्त वाढवावी आणि गस्त करतांना पोलीसांनी जनतेतील चांगल्या लोकांशी संपर्क ठेवावा. यासाठी फक्त गाडी आणि मोटार सायकलीने गस्त न करता पायी पेट्रोलींग सुध्दा ठेवावी. गस्त पार्टीनी महत्वाची ठिकाणी जसे धार्मिक स्थळे, बाजार, सोन्याचांदीचे दुकाने, गर्दीचे ठिकाण हॉस्पीटल, सिनेमागृह इत्यादी ठिकाणी भेट दयावी आणि लोकांमध्ये पोलीसांप्रती विश्वास आणि आदर वाढेल असे वर्तन ठेवावे. पोलीस चौकी इन्चार्ज तसेच ठाणेदार यांनी स्वत:पण आपल्या हद्दीत संवेदनशिल भागामध्ये नियमीतपणे गस्त घालावी आणि चांगल्या नागरीकांन भेटत राहावे. यावरुन त्यांना आपल्या हद्दीतील परिस्थितीची प्रत्यक्ष जाणीव होईल आणि जनतेमध्ये पोलीसांचे प्रति विश्वास व आदर वाढेल.

## ३) जातीय दंगलीचे गुन्हयात सहभाग असलेल्या लोकांवर कारवाई करणे

जे लोक यापुर्वी घडलेले जातीय दगंलीचे गुन्हयात निष्पन्न झालेले आहेत त्यांना अटक केले पाहीजे. तसेच असे गुन्हयांचा तपास लवकरात- लवकर पुर्ण करुन खटला कोर्टात दाखल करावा. असे लोक पुन्हा गुन्हे करणार नाहीत आणि शातंता भंग करणार नाहीत म्हणुन त्यांच्यावर कडक प्रभावी प्रतिबंधात्मक कारवाई करावी.

## ४) गैरकायदेशीर धंदे करणारे व इतर गुन्हेगारांवर कारवाई करणे

गैरकायदेशीर दारु, मटका,जुगार,क्लब इत्यादी चालविणारे लोकांवर वचक बसेल या दृष्टीने ठाणेदार यांनी त्यांचेवर वेळोवेळी छापे घालुन कार्यवाही करावी. तसेच चाकु बाळगणारे, जबरी चोरी करणारे, मुलींना छेडछाड करणारे आणि असे इतर गुन्हेगारांवर सुध्दा वचक बसेल म्हणुन कडक कारवाई केली पाहीजे. यासाठी वेळोवेळी नाकाबंदी लावणे, गर्दीचे ठिकाणे चेक करणे, रेकॉर्डवरील गुन्हेगार वारंवार चेक करण्याची आवश्यकता आहे.

५) वरील व्यतिरिक्त ठाणेदारांनी आपल्या हद्दीबाबत हद्दीत असलेल्या लोकांबाबत आणि स्टाफ बाबत पुर्ण माहीती घ्यावी. संवेदनशिल ठिकाणांवर जास्त लक्ष दयावे, जातीयदंगल भडकविणा-या लोकांवर लक्ष ठेवावे. पोलीसांना मदत करणारे लोकांच्या संपर्कात राहुन त्यांचा सहभाग घ्यावा आणि कायदा व सुव्यवस्था राखणे आणि जातीय सलोखा निर्माण करणा-या पोलीस अधिकारी व कर्मचा-यांना योग्य ठिकाणी नेमावे त्यांनी गेल्या १० वर्षात घडलेले जातीय दंगलीचे गुन्हयांचे विश्लेषण करुन प्रतिबंधात्मक उपाययोजना आखावी. उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी आपले उप विभागातील संवेदनशिल पोलीस स्टेशन आणि संवेदनशिल भागाचा आढावा घेवुन ठाणेदार यांना योग्य मार्गदर्शन करावे. तसेच वर नमुद केल्याप्रमाणे ठरविण्यात आलेली उपाय योजना प्रभावीपणे लागु होईल याची खात्री करावी आणि वेळो-वेळी प्रत्यक्ष पडताळणी करावी.

६) पोलीस निरीक्षक, जिल्हा विशेष शाखा यांनी राज्य गुप्तवार्ता विभाग आणि त्यांचे स्व:ताचे माध्यमातुन प्राप्त होणारे कायदा व सुव्यवस्था संबंधी गोपनिय माहीतीचा अभ्यास करुन संबंधीत ठाणेदार/उप विभागीय पोलीस अधिकारी यांना मार्गर्शनात्मक सुचना दयावी. पो.नि. जिविशा यांनी अकोला शहरातील सर्व पोलीस ठाण्याला महीन्यातुन कमीत-कमी एकदा तर ग्रामिण भागातील संवेदनशिल पोलीस स्टेशनला दर तीन महीन्यातुन कमीत-कमी एकदा प्रत्यक्ष भेट देवुन तेथील जातीय वातावरण बाबत माहीती घ्यावी आणि ठाणेदारांशी समक्ष चर्चा करुन त्यांना आवश्यक ते मार्गदर्शन करावे

७)	पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा यांच्याकडे विशेष कार्यकारी दंडाधिकारी म्हणुन येणारे प्रकरणाचा निपटारा विनाविलंब करावा.

८)	पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक यांनी अकोला शहरातील आणि जिल्हयातील संवेदनशिल सर्व पोलीस स्टेशनला वेळो-वेळी भेट देवुन वरील योजना योग्य प्रकारे लागु करण्यात येत आहे याची खात्री करावी. तसेच पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेशी वार्तालाप करुन आणि चांगले नागरीकांशी संपर्क ठेवुन कायदा व सुव्यवस्था आणि जातीय परिस्थितीचा आढावा घ्यावा आणि संबंधीत पोलीस अधिकारी यांना मार्गदर्शन करावे.

९)	पोलीस अधीक्षक यांनी संवेदनशिल पोलीस स्टेशनला पुरेसे मनुष्यबळ, गाडया,हत्यारे आणि इतर साधनसामुग्री उपलब्ध आहे याची खात्री करावी. तसेच कोणतीही क्षुल्लक घटना ज्यावरुन जातीय परिस्थितीला धोका घडु शकतो अशी घटना गंभीरतेने घेवुन वेळीच कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी.

१०)	पोलीसांचे मनोधैर्य आणि मनोबल वाढविण्याचे दृष्टीने पोलीस अधिका-यांनी त्यांचेशी वेळो-वेळी वार्तालाप करावा. आतंकी घटना आणि जातीय दंगली सारख्या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी सर्वांनी मनापासुन काम करावे असे त्यांना समजावुन सांगावे. तसेच कामचुकार आणि कसुरी करणा-यांवर वेळीच योग्य कार्यवाही करावी.

११) सर्व सबंधीतांनी वर नमुद केल्याप्रमाणे सर्व बाबी गंभीरतेने घेवुन त्यांना मनापासुन लागु करावे आणि नियमितपणे पाठपुरावा करावा. अकोला शहर आणि अकोला जिल्हयात जातीय वातावरण नाजुक असल्याने सर्वांनी अधिक परिश्रम करुन जातीय दंगल प्रतिबंध करण्यासाठी आणि जातीय सलोखा निर्माण करण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करावेत.

**(डॉ.दलबीर भारती)**

**पोलीस महानिरीक्षक**

**अमरावती परिक्षेत्र,अमरावती**

**कॅम्प-अकोला**

**oooo**